**श्री.अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात..**
दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/८४/२०२४
दिनांक २४ .०२.२०२५

**प्रति,**

१. श्रीमती जयश्री विशाल मासाळ
रा. मासाळ बोअरवेल,कवठेमहांकाळ जि.सांगली ---------- **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. राजेंद्र ज्ञानोबा तांबे
२. श्रीमती कमलाबाई मल्हारी तांबे
३. नामदेव म्ळाळाप्पा सुळ
अ.नं.१ रा. आंबेघर वसाहत, पलुस ता.पलूस जि.सांगली
अ.नं. २ रा. हुबनूर ता. जि.विजयपूर
अ.क्र.३ रा.तिकोंडी ता.जत जि.सांगली ----------- **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र**

मौजे कागनरी, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर १४८ या मिळकत प्रकरणी मंडळ अधिकारी संख यांनी फेरफार नंबर ३४४८, प्रकरणी तक्रार/रजि/६५/२०२३,दिनांक ०५.०२.२०२४ ने दिले निर्णयावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपील दाखल केलेले आहे.

**अपिलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रीतसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपील मेमो, प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे यांचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

प्रकरणी अपिलार्थी यांना प्रस्तूत अपिलकामी नोटीस बजाऊन म्हणणे मांडणेकामी वारंवार संधी देणेत आली आहे. तसेच प्रकरणी अपिलार्थी व त्यांचे विधीज्ञ यांना www.eqjcourts.gov.in या संगणक प्रणालीदवारे सुनावणीबाबत एस.एम.एस व विधीज्ञ यांना whatsapp द्वारे सुनावणीकामी कळविणेत आले आहे. उक्त सुनावणी दिनांकास अपिलार्थी यांचे विधिज्ञ हजर होते. तसेच आजअखेर अपिलार्थी यांनी सर्व जाबदार यांना नोटीस बजावणी केलेली नाही. तसेच प्रस्तुत अपील चालविणेकामी अपिलार्थी हे काही एक प्रयत्न करीत नसलेचे दिसून येत आहेत. त्यामुळे प्रस्तुतचे अपील अपिलार्थी यांना चालविणेचे स्वारस्य दिसून येत नसल्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २३२ अन्वये प्रस्तुत प्रकरण कामकाजातून काढून टाकणे आवश्यक असलेचे माझे मत झालेने मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**प्रकरणी अपिलार्थी यांना प्रस्तुत अपील चालविणेत स्वारस्य दिसून येत नसल्याने प्रस्तुत प्रकरण कामकाजातून काढून टाकण्यात येत आहे.**

सदर निकालाची समज सर्व संबंधीताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.in या वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

(अजयकुमार नष्टे)
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण – जत
दिनांक – २४ .०२.२०२५

**प्रत—अपर तहसिलदार,संख यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.**